# बदललेल्या माध्यमामुळे वाचन संस्कृतीत बदल

## संजय पेठे : इंटरनेटवरील साहित्याचा आस्वाद घ्या



**संजय पेठे**

**नाशिक, ता. २ :** ''इंटरनेटवर माहितीचा खजाना आहे. अनेक मराठी साहित्य इंटरनेटवर उपलब्ध आहे. वाचन कमी होत चालले आहे, असे म्हणण्यापेक्षा बदलल्या माध्यमांमुळे वाचन संस्कृतीतही बदल होत आहे, असे म्हणणे उचित ठरणार आहे,'' असे प्रतिपादन मुंबई येथील संजय पेठे यांनी आज केले. सार्वजनिक वाचनालय, नाशिकतर्फे ४४ व्या जिल्हा साहित्यिक मेळाव्यात 'इंटरनेटवरील साहित्याचा आस्वाद कसा घ्यावा' या विषयावर ते बोलत होते.

'सावाना'च्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात झालेल्या कार्यक्रमास संमेलनाध्यक्ष शिवाजीराव तुपे, वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर झेंडे, चंद्रकांत महामिने, वसंत खैरनार, श्रीकांत बेणी, स्वप्नील तोरणे, डॉ. वेदश्री थिगळे, शंकरराव बर्वे उपस्थित होते.

श्री. पेठे म्हणाले, ''ग्लोबल मराठी डॉटकॉमवर सर्व प्रकारची माहिती उपलब्ध आहे. विविध पुस्तकांच्या प्रकाशकांकडे मागणी करून माहिती संकलित करण्यात येत आहे. सध्या अशा प्रकारच्या ३६ हजार पुस्तकांचे संकलन येथे करण्यात आलेले आहे. ही पुस्तके इंटरनेटवर दिसत आहेत. लेखकाचे नाव टाइप करताच त्याची सर्व पुस्तकांची यादी येथे दिसते. मराठी साहित्य व भारतीय साहित्य समृद्ध आहे, याची चर्चा होते; मात्र बंगाली, तमिळी आदी भाषांतील साहित्याचा बोलबाला जास्त आहे. त्यांची अनेक पुस्तके इतर भाषांमध्ये भाषांतरित होत आहेत. बुकगंगा डॉटकॉम या वेबसाइटवर संगणकावर वाचता येतील, अशी पुस्तके उपलब्ध आहेत. हे इ-बुक घेत राहिल्यास त्याची पर्सनल लायब्ररी होऊ शकेल. हे डाऊनलोड केलेले पुस्तक इतरांना पाठविता येत नाही, त्याची प्रिंट काढता येत नाही, त्यामुळे हे पूर्ण सुरक्षित आहे. जनमानसाची भाषा संगणकामुळे लोकांमध्ये पोचली.''

संजय परांजपे यांनी सूत्रसंचालन केले. नरेश महाजन यांनी स्वागत केले.